जनमानसाचा निडर आवाज...

पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २०१ | शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### पुणे महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा संपन्न

**पुणे, ता. १३ :** पुणे महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. या बैठकीत भाजपने आगामी स्थायी समितीसाठी आपल्या सदस्यांची नावे जाहीर केली. यंदा अनेक नवनिर्वाचित नगरसेवकांना स्थायी समितीत संधी देण्यात आल्याने महापालिकेतील राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळण्याची चिन्हे आहेत. आता पुढील आठवड्यात पीठासन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची निवड होणार आहे. या पार्श्व भूमीवर अध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेले भाजप नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांनी माध्यमांशी संवाद साधताना महत्त्वाची माहिती दिली. पक्षाकडून स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीबाबतही लवकरच निर्णय होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजपकडून जयश्री भुमकर, रूपाली धाडवे, कालिंदा पुंडे, विशाल कानवडे, सातव रत्नमाला, प्राची आल्हाट, मयुरी कोकाटे, दादा कोंद्रे, वृषाली कामठे, संदीप बेलदरे, मानवतकर निशा, श्रीनाथ भिमाले यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नावे जाहीर करण्यात आले आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकार ॲक्शन मोडमध्ये

## नवी उच्चस्तरीय समिती गठीत! वाल्मीक कराडच्या अडचणी वाढणार?

**पुणे, ता. १३ :** संतोष देशमुख हत्या प्रकरणाने पुन्हा एकदा वेग घेतला असून, राज्य सरकारने या संवेदनशील प्रकरणात मोठा प्रशासकीय निर्णय घेतला आहे. ९ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या या निर्घृण हत्येनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. या गुन्ह्यात वाल्मीक कराड याला मुख्य आरोपी ठरवण्यात आले असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.




प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच, महाराष्ट्र गृह विभागाने क्शन टेकन रिपोर्ट तयार करण्यासाठी नव्या उच्चस्तरीय समितीची पुनर्रचना केली आहे. याआधी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती एम. एल. ताहलियानी समितीने सादर केलेल्या अहवालातील निरीक्षणांची सखोल छाननी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

नव्या समितीचे अध्यक्षपद गृह खात्याचे अपर मुख्य सचिव भूषवणार असून, समितीत प्रधान सचिव (विशेष) तसेच अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ताहलियानी समि तीच्या अहवालात तपासातील त्रुटी, प्रशासकीय हलगर्जीपणा आणि काही गंभीर बाबींचा उल्लेख असल्याचे सांगितले जाते. या निष्कर्षांचे बारकाईने परीक्षण करून पुढील कारवाईची दिशा ठरवणे, हे नव्या समितीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

सरकारी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या समितीचा सविस्तर अहवाल आगामी अधिवेशनात विधिमंडळात सादर केला जाण्याची शक्यता आहे. दोषींवर कठोर कारवाई, तपास यंत्रणेतील उणिवा दूर करणे, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना सुचवणे, हे या अहवालाचे मुख्य मुद्दे असणार आहेत. त्यामुळे या नव्या हालचालीमुळे तपास प्रक्रियेला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी न्यायासाठी सातत्याने लढा दिला असून लवकर आणि निष्पक्ष न्याय मिळावा ही त्यांची ठाम मागणी आहे. समर्थकांकडूनही प्रकरणाचा पाठपुरावा सुरू आहे. समि तीतील हा बदल केवळ प्रशासकीय औपचारिकता नसून, तपास अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी करण्याचा गंभीर प्रयत्न म्हणून पाहिला जात आहे. आगामी काळात या अहवालावर विधिमंडळात जोरदार चर्चा होण्याची शक्यता असून, या प्रकरणाचे राजकीय तसेच प्रशासकीय पातळीवर दूरगामी पडसाद उमटू शकतात. विशेषतः मुख्य आरोपी वाल्मीक कराडसाठी येणारा काळ अधिक कठीण ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.



## लोणावळ्यात दरीत उडी मारून तरुणाची आत्महत्या

**लोणावळा, ता. १३ :** लोणावळ्यातील टायगर पॉइंट येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने वैवाहिक तणाव किती टोकाला जाऊ शकतो, याची वेदनादायी जाणीव करून दिली आहे. पत्नीशी सुरू असलेल्या वादातून नैराश्यात गेलेल्या ३० वर्षांच्या विरेंद्र सिन्हा यांनी सुमारे २०० ते २५० फुट खोल दरीत उडी घेत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. विरेंद्र हे मूळचे पश्चिम बंगालचे असून सध्या हिंजवडी येथे एका कंटेनर विक्री करणाऱ्या कंपनीत सेल्स विभागात कार्यरत होते.

माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून पती-पत्नीमध्ये वाद सुरू होते. ७ फेब्रुवारी रोजी दोघांम ध्ये तीव्र भांडण झाले. त्यानंतर १० फेब्रुवारीला पत्नी माहेरी निघून गेली. १३ फेब्रुवारीला तिचा वाढदिवस होता. मध्यरात्रीपासून विरेंद्र यांनी पत्नीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र मोबाईल नंबर ब्लॉक केल्यामुळे संवाद होऊ शकला नाही. पहाटे ५ ते ६ च्या दरम्यान त्यांनी पत्नीला मेसेज आणि व्हिडिओ पाठवत आत्महत्येचा इशारा दिला. पत्नीने तत्काळ संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; पण तोपर्यंत उशीर झाला होता.

टायगर पॉइंटवरून उडी घेतल्यानंतर स्थानिक बचाव पथक शिवदुर्ग लोणावळा मित्र यांच्या म दतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला. तीन वर्षांपूर्वीच विवाह झालेल्या या दांपत्याच्या आयुष्यातील हा अंत दुर्दैवी ठरला. गेल्या आठवड्यातही याच परिसरात एका तरुणीने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. टायगर पॉइंट आणि लायन्स पॉइंटसारखी ठिकाणे पर्यटनासाठी प्रसिद्ध असली, तरी अशा घटना वारंवार घडत असल्याने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तज्ज्ञांच्या मते, वैवाहिक वाद, नैराश्य आणि मानसिक ताण याकडे वेळीच लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. संवाद तुटणे हा अनेकदा संकटाचा पहिला टप्पा असतो. अशा प्रसंगी समुपदेशन, कुटुंबीयांची मदत आणि मानसिक आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घेणे जीवन वाचवू शकते.

## पुणे, नाशिकसह नागपूर शहरात फार्मा–इन्क्युबेशन पार्कच्या प्रस्तावाला मंजुरी : मंत्री नरहरी झिरवाळ

**नवी दिल्ली, ता. १३ :** केंद्र सरकारने महाराष्ट्रातील अन्न व औषध प्रशासन विभाग अधिक सशक्त करण्यासाठी आवश्यक निधी वाढवण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिल्याची माहिती राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.




यासोबतच, राज्यातील औषध संशोधन, उत्पादन व औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी केंद्राने नाशिक, पुणे आणि नागपूर या तीन शहरांत इन्क्युबेशन पार्क व फार्मा पार्क उभारण्यास प्राथमिक स्तरावर मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांवर चर्चा करण्यासाठी मंत्री झिरवाळ यांनी दिल्लीमध्ये केंद्रीय आरोग्य मंत्री नड्डा यांची भेट घेतली.

मंत्री झिरवाळ सध्या दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर असून, त्यांनी विविध केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन राज्यासाठी महत्त्वाचे प्रकल्प पुढे नेण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सक्षमीकरणासाठी निधी वाढीची मागणी केंद्राकडे मांडली, ज्याला नड्डा यांनी मान्यता दिली.

### आदिवासी भागासाठी आरोग्य-शिक्षण प्रकल्प

दिल्ली दौऱ्यात झिरवाळ यांनी केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्री जुआल ओराम यांचीही भेट घेतली. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण व आरोग्य सुविधांना बळकटी देण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली. केंद्र सरकारकडून आदिवासी भागातील नागरिकांच्या जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक निधी व सहकार्य देण्याचे आश्वासन मिळाले.

यावेळी झिरवाळ यांनी आदिवासी भागात आयुष मंत्रालयांतर्गत सुमारे ३०० आयुर्वे दिक दवाखाने उभारण्याचा मानस असल्याचेही स्पष्ट केले. तसेच आदिवासी समुदायात मौखिक स्वरूपात राहणाऱ्या पारंपरिक आयुर्वेदिक ज्ञानाचे शास्त्रोक्त दस्तऐवजीकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे आदिवासी भागातील पारंपरिक वैद्यकीय ज्ञानाचे जतन व संवर्धन होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अजितदादा पवार यांच्या अपघाताचं गूढ आता जगासमोर येणार

**पुणे, ता. १३ :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर निर्माण झालेल्या संशयाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अधिकृत चौकशी प्रक्रिया सुरू केली आहे. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी या प्रकरणाची चौकशी एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो अर्थात एएआयबी कडे सोपवली आहे. एएआयबी ही देशातील विम ान अपघातांची चौकशी करणारी स्वतंत्र आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम संस्था असून ती थेट केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करत नाही. आवश्यक असल्यास ही संस्था आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची मदतही घेऊ शकते.



अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेनंतर हा अपघात की घातपात, यावरून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन या दुर्घटनेत अनेक विसंगती असल्याचा दावा केला होता. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी त्यांची मागणी होती. त्यानंतर आता अधिकृतपणे एएआयबी चौकशी सुरू झाल्याने या मागण्यांना प्रतिसाद मिळाल्याचे मानले जात आहे.

एएआयबी ची स्थापना देशात विमान दुर्घटनांची निष्पक्ष चौकशी व्हावी या उद्देशाने करण्यात आली होती. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल हे केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री असताना या संस्थेची उभारणी झाली होती. विमान अपघातांमध्ये साधारणपणे दोन प्रमुख बाबींची तपासणी केली जाते वैमानिकाची चूक किंवा विमानातील तांत्रिक बिघाड. मात्र, या प्रकरणात विविध राजकीय नेत्यांनी अधिक व्यापक चौकशीची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नागरी उड्डाण मंत्र्यांना पत्र लिहून सखोल चौकशीची मागणी केली होती. आता एएआयबी कडून तपास सुरू झाल्याने ब्लॅक बॉक्सचे विश्लेषण, हवामान परिस्थिती, एअर ट्रॉफिक कंट्रोल संवाद आणि विमानाच्या देखभाल नोंदी यांचा तपशीलवार अभ्यास केला जाणार आहे. या चौकशीचा निष्कर्ष केवळ या दुर्घटनेमागील सत्य उघड करणार नाही, तर भविष्यातील उड्डाण सुरक्षेसाठीही महत्त्वाचा ठरणार आहे.

## पुण्यात पोलीस भरतीमुळे वाहतुकीत मोठा फेरबदल!

**पुणे, ता. १३ :** पुणेकरांनी पुढील काही दिवस पाषाण रस्त्यावरून प्रवास करताना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. शहरात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेमुळे पाषाण येथील पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालय परिसरातील वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते पण महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. उमेदवारांची वाढती गर्दी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १७ फेब्रुवारीपर्यंत दररोज पहाटे ४ ते सायंकाळी ६ या कालावधीत अंतर्गत रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




पोलिस भरतीसाठी राज्यभरातून हजारो तरुण दररोज मुख्यालयात येत आहेत. पहाटेपासूनच मैदान परिसरात मोठी रांग लागत असल्याने रस्त्यावर वाहनांची कोंडी होत होती. गर्दीवर नियंत्रण ठेवणे, उमेदवारांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करणे आणि आपत्कालीन परिस्थितीत मार्ग मोकळा ठेवणे या कारणांमुळे वाहतूक शाखेने हा निर्णय घेतला आहे.

पाषाण रस्त्यावरील पेट्रोल पंपाजवळील प्रवेशद्वार ते बाणेर रस्त्याकडील प्रवेशद्वार हा मार्ग पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे बाणेर, औंध, विद्यापीठ परिसरातून पाषाणकडे जाणाऱ्या वाहनचालकांना मोठा फेरा घ्यावा लागू शकतो. पर्यायी मार्ग म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा समोरील आचार्य आनंदऋषीजी चौक मार्गे वळसा घेण्याचे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

या बदलांचा सर्वाधिक परिणाम सकाळच्या आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत जाणवण्याची शक्यता आहे. कार्यालयीन वेळेत प्रवास करणाऱ्यांनी वेळेआधी घराबाहेर पडणे, जीपीएसवरील लाईव्ह ट्रॉफिक अपडेट तपासणे आणि शक्य असल्यास सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे अधिक सोयीचे ठरेल.

पोलीस भरती प्रक्रिया संपेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार असल्याने नागरिकांनी संयम बाळगून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिवसेनेत ‘भाकरी’ फिरणार?

## महापालिका निकालांनंतर एकनाथ शिंदे यांचा मोठा मास्टरस्ट्रोक

**मुंबई, ता. १३ :** राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून शिवसेनामध्ये लवकरच मोठे संघटनात्मक तसेच मंत्रिमंडळ स्तरावरील बदल होण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा निवडणुका आणि अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांचा सखोल आढावा घेतल्यानंतर हा निर्णय आकार घेत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळते.



कोकण व पश्चिम महाराष्ट्र वगळता अनेक जिल्ह्यांत अपेक्षित कामगिरी न झाल्याची गंभीर नोंद शिंदे यांनी घेतली आहे. काही मंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर त्यांनी स्पष्ट नाराजी व्यक्त करत थेट कानपिचक्या दिल्याचे समजते. सूत्रांच्या माहितीनुसार, २ ते ४ मंत्र्यांना पदावरून हटवून त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता असून, आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्व भूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

निवडणुकांतील पराभवाची कारणे शोधण्यासाठी जिल्हासंपर्क प्रमुख, पक्षनेते आणि सचिवांना गावागावांत जाऊन संघटना मजबूत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवर नेमक्या कुठे त्रुटी राहिल्या, कोणत्या भागात संघटनात्मक कमजोरी दिसून आली, याचा सविस्तर अहवाल तयार करण्यास सांगण्यात आले आहे. फक्त ताफा घेऊन फिरणे पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष कामगिरी दिसली पाहिजे, असा स्पष्ट इशाराही शिंदे यांनी मंत्र्यांना दिल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर वगळता इतर अनेक महानगरपालिका क्षेत्रांत पक्षाला मोठा फटका बसला. काही प्रभावी नेत्यांच्या नातेवाईकांनाही पराभव स्वीकारावा लागल्याने नेतृत्व अधिक आक्रमक झाले आहे. त्यामुळे आता कामगिरीच्या आधारेच जबाबदाऱ्या ठरवण्याचा ठाम संदेश देण्याची तयारी सुरू आहे. दरम्यान, या संभाव्य फेरबदलांमुळे शिंदे गटात नव्या नेतृत्वाला संधी मिळण्याची शक्यता असून, आगामी निवडणुकांपूर्वी पक्षाची प्रतिमा नव्याने उभारण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कोणावर कारवाई होणार, कोणाला संधी मिळणार आणि कोणाची भाकरी फिरणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## महिलेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला अटक

**पुणे, ता. १३ :** हैदराबादहून पुण्याकडे येणाऱ्या खासगी स्लीपर बसमध्ये महिला प्रवाशाशी गैरवर्तन झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संबंधित महिला आपल्या पतीसोबत प्रवास करत असताना हा प्रकार घडल्याने संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, हडपसर पोलिसांनी तत्पर कारवाई करत अवघ्या २४ तासांत आरोपीला अटक करून न्यायालयात दोषारोपपत्रही दाखल केले. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ९ फेब्रुवारीच्या रात्री घडली. पीडित महिला आणि तिचे पती काचीगुडा (हैदराबाद) येथून रात्री १० वाजता खासगी ट्रॅव्हल्सच्या स्लीपर बसने पुण्याकडे रवाना झाले होते. पहाटेच्या सुमारास बसमध्ये प्रवास करणाऱ्या निशीत कुमार यशवंत सिंग (वय ४७, रा. मीरा रोड, मुंबई) याने महिलेशी अश्लील वर्तन केल्याचा आरोप आहे. महिला अचानक जागी झाल्यानंतर तिने प्रसंगावधान राखत संबंधित प्रकाराचा मोबाईलवर व्हिडिओ रेकॉर्ड केला.

## संक्षिप्त

### प्रेमाच्या जाळ्यात ओढून खंडणी मागणाऱ्या महिलेचा जामीन अर्ज फेटाळला



**पुणे, ता. १३ :** धार्मिक स्थळावर झालेल्या ओळखीचा फायदा घेऊन एका विवाहित पुरुषाला प्रेमजाळ्यात ओढणे आणि त्यानंतर बलात्काराची भीती दाखवून लाखो रुपये उकळल्या प्रकरणी मुख्य आरोपी गौरी प्रल्हाद वाजळे (४२, रा. वनाज) हिचा अटकपूर्व जामीन अर्ज पुणे सत्र न्यायालयाने फेटाळून लावला असून, तिने अशाच प्रकारे अनेकांना लुटल्याचे आता समोर येत आहे. या प्रकरणातील तक्रारदार हे कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगडचे ४७ वर्षीय गृहस्थ आहेत. ३ मार्च २०२५ रोजी एका तीर्थयात्रेदरम्यान त्यांची ओळख गौरीशी झाली होती. ओळखीचा गैरफायदा घेत महिलेने जवळीक वाढवली आणि तक्रारदाराला शरीरसंबंध ठेवण्यास प्रवृत्त केले. मात्र, हा प्रेमाचा देखावा नसून तो एक नियोजनबद्ध 'हनी ट्रॅप' होता, याची कल्पना तक्रारदाराला नव्हती. काही काळानंतर गौरीने आपले खरे रूप दाखवण्यास सुरुवात केली. तिने तक्रारदाराकडे चक्क २ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. जर पैसे दिले नाहीत, तर तुझ्याविरुद्ध बलात्काराची खोटी तक्रार दाखल करून तुझं आयुष्य उद्ध्वस्त करेन, अशी धमकी तिने दिली. घाबरलेल्या तक्रारदाराने अखेर तक्रार नोंदवली. तपासादरम्यान गौरी वाजळे हिने यापूर्वीही पुणे आणि राज्यातील इतर शहरांमधील विविध पोलीस ठाण्यांत अशाच प्रकारच्या बलात्काराच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. याप्रकरणी सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तिचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

### लाँड्री व्यावसायिकाला सायबर चोरट्यांनी घातला १ कोटी १५ लाखांचा गंडा

पुणे, ता. १३ : सायबर गुन्हेगारांनी आता सामान्य व्यावसायिकांना लुटण्यासाठी 'हनी ट्रॅप' चा एक सापळा रचण्यास सुरुवात केली आहे. पुण्याच्या पर्वती परिसरातील एका ४८ वर्षीय लाँड्री व्यावसायिकाला एका अज्ञात महिलेचा फोन चक्क १ कोटी १५ लाख रुपयांना पडला आहे. घरबसल्या करोडपती होण्याचे स्वप्न दाखवून या व्यावसायिकाचे आयुष्यभराची पुंजी सायबर भामट्यांनी लंपास केली आहे. सानिका गोखले असे आरोपी महिलेचे नाव आहे. ऑगस्ट महिन्यात तिने या व्यावसायिकाला फोन केला. सानिकाने अत्यंत गोड बोलून व्यावसायिक आणि त्यांच्या भावाला एका व्हॉट्सप ग्रुपमध्ये सामील करून घेतले. शेअर बाजारात सध्या मोठी तेजी आहे आणि आमच्या टिप्स वापरल्यास तुम्हाला घरबसल्या लाखोंचा नफा मिळेल, असे आमिष तिने दाखवले. सानिकाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून व्यावसायिकाने सुरुवातीला काही रक्कम गुंतवली. आरोपींनी एका बनावट ट्रेडिंग पोर्टलवर त्यांना प्रचंड नफा झाल्याचे आभासी आकडे दाखवले. आकडा पाहून व्यावसायिकाने टप्प्याटप्प्याने तब्बल १ कोटी १५ लाख ११ हजार रुपये विविध बँक खात्यांत जमा केले. मात्र, जेव्हा ही रक्कम प्रत्यक्ष बँक खात्यात काढण्याची वेळ आली, तेव्हा आरोपींनी तांत्रिक अडचणीचे कारण सांगून टाळाटाळ केली आणि अखेर संपर्क तोडला. दरम्यान, आपल्याला फसवल्याचे व्यावसायिकाला लक्षात आले. दरम्यान, तक्रार दाखल केली असून अधिक तपास सुरु आहे.




### अजित पवारांना मुंबईत थांबवलं? नवी थेअरी आली समोर

**मुंबई, ता. १३ :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका अपघाताने नव्हे, तर त्यामागील कारणांनी वादळ उठवले आहे. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या प्रकरणाला आता राजकीय वळण मिळाले असून, यामागे एखादा मोठा कट होता का? असा संशय व्यक्त केला जात आहे. हे प्रकरण केवळ तांत्रिक बिघाडापुरते मर्यादित न राहता आता फाईल, फोन आणि फ्लाईट' या तीन सूत्रांभोवती फिरू लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अपघाताच्या आदल्या दिवशी अजित पवार रस्तेमार्गे बारामतीला जाण्याच्या तयारीत होते. मात्र, ऐनवेळी दोन घटना घडल्या ज्यामुळे निर्णय बदलला.राष्ट्रवादीचे नेते प्रमोद हिंदूराव यांनी खळबळजनक दावा केला आहे की, त्या संध्याकाळी प्रफुल्ल पटेल किंवा अन्य एका बड्या नेत्याचा फोन आला होता. या फोननंतरच अजितदादांनी निर्णय बदलला. रोहित पवार यांच्या दाव्यानुसार, एका वरिष्ठ नेत्याने एका विशिष्ट फाईलवर सही करण्यासाठी दादांना थांबवून ठेवले होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही फाईल पूर्व विदर्भातील राईस मिलशी संबंधित किंवा एखाद्या मोठ्या कंत्राटाशी संबंधित होती. ही फाईल येण्यास उशीर झाल्यामुळे रात्री रस्तेमार्गे जाण्याऐवजी दुसऱ्या दिवशी विमानाने जाण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, या प्रकरणावर संजय राऊत यांनी थेट 'भ्रष्टाचाराच्या फाईल'चा अँगल जोडला आहे. दुसरीकडे, प्रमोद हिंदूराव यांनी थेट प्रफुल्ल पटेलांचे नाव घेतल्याने राष्ट्रवादीच्या गोटात मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे.

# प्राध्यापक भरतीच्या नियमांमध्ये आता बदल

**मुंबई, ता. १३ :** राज्यातील सार्वजनिकविद्यापीठेआणिसंलग्नवरिष्ठ महाविद्यालयांमधील प्राध्यापक भरती प्रक्रिया दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने निर्माण झालेल्या अनिश्चिततेवर आता तोडगा निघण्याची चिन्हे दिसत आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुधारित कार्यपद्धती जाहीर करत भरती प्रक्रियेला नव्याने वेग देण्याचा निर्णय घेतला आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जाहीर केलेली ६०:२०:२० गुणांकन पद्धती नव्या आदेशात समाविष्ट करण्यात आली आहे. ६ ऑक्टोबर २०२५ च्या आदेशात सुधारणा करत ही पद्धत लागू करण्यात आली आहे.



त्यानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक आणि संशोधन कार्याला ६० टक्के, अध्यापन कौशल्य चाचणीला २० टक्के आणि मुलाखतीतील काम गिरीला २० टक्के गुण दिले जाणार आहेत. त्यामुळे केवळ मुलाखतीवर आधारित निवडीऐवजी सर्वांगीण मूल्यमापनाला प्राधान्य देण्यात आले आहे.

**मानवविज्ञान शाखेला काही प्रमाणात शिथिल**

मानवविज्ञान शाखेतील प्राध्यापकांसाठी स्कोपस आणि वेब ऑफ सायन्समधील प्रकाशनांची सक्ती काही प्रमाणात शिथिल करण्यात आली आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील अध्यापकांना याचा मोठा फायदा होणार आहे. या शाखेतील पुस्तक प्रकाशन आणि दर्जेदार लेखनालाही गुणांकनात मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समान संधी राखत गुणवत्ता जपण्याचा प्रयत्न या बदलातून दिसून येत आहे.

**वरिष्ठ पदांसाठी अधिक काटेकोर निकष**

सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांसाठी अनुभव, संशोधन प्रकल्पांतील सहभाग, राष्ट्रीय स्तरावरील संस्थांकडून मिळालेला संशोधन निधी, पीएचडी मार्गदर्शन आणि अभ्यासक्रम विकास यांसारख्या बाबींना अधिक महत्त्व देण्यात आले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता उंचावण्यासाठी वरिष्ठ पदांकरिता कडक निकष निश्चित करण्यात आले आहेत.

### कंत्राटी व तासिका शिक्षकांना संधी

कंत्राटी, तासिका तत्त्वावरील आणि ॲडहॉक स्वरूपात कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या अनुभवाला पात्रतेसाठी मान्यता देण्यात येणार आहे. यापूर्वी मुलाखतीपूर्वी ५० टक्के गुणांची अट होती; ती शिथिल करून विद्यापीठे व महाविद्यालयांना उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्याचे अधिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यामुळे दीर्घकाळ सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी नियमित नियुक्तीची दारे खुली होण्याची शक्यता आहे.

### पारदर्शकतेसाठी नवी तरतूद

भरती प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी निवड समितीच्या संपूर्ण कामकाजाचे ऑडिओ–व्हिडिओ रेकॉर्डिंग अनिवार्य करण्यात आले आहे. हे रेकॉर्डिंग समिती सदस्यांच्या स्वाक्षरीने सीलबंद ठेवले जाणार असून, न्यायालयीन आवश्यकता भासल्यासच ते उपलब्ध करून दिले जाईल. या नव्या कार्यपद्धतीमुळे राज्यातील प्राध्यापक भरती प्रक्रियेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# किसान क्रेडिट कार्ड योजनेत मोठे बदल

**मुंबई,ता. १३ :** आरबीआय ने किसान क्रेडिट कार्ड योजनेसाठी सुधारित मसुदा मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून कृषी कर्ज वितरण अधिक सुसंगत, पारदर्शक आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजांनुसार करण्याचा प्रयत्न केला आहे. ही नवी रूपरेषा व्यावसायिक बँका, लघु वित्त बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि ग्रामीण सहकारी बँकांना लागू राहणार आहे.




पीक चक्रानुसार कर्जरचना मसुद्यात कर्ज मंजुरी आणि परतफेड प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी पीक हंगामांचे मानकीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. कमी कालावधीच्या पिकांसाठी १२ महिन्यांचे, तर दीर्घ कालावधीच्या पिकांसाठी १८ महिन्यांचे चक्र निश्चित करण्यात आले आहे. यामुळे कर्जाची मुदत प्रत्यक्ष उत्पादन कालावधीशी अधिक जुळवून घेता येईल.

दीर्घ कालावधीच्या पिकांसाठी किसान क्रेडिट कार्ड कर्जाचा कालावधी सहा वर्षांपर्यंत वाढवण्याची तरतूद सुचवण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना कापणीनंतर उत्पादनाची विक्री करून कर्जफेड करण्यासाठी अधिक अवधी मिळेल. खर्चाधारित कर्ज मर्यादा प्रत्येक पीक हंगामाशी कर्ज मर्यादा थेट जोडण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. लागवड खर्च, मजुरी, सिंचन आदी घटकांचा विचार करून कर्जाची मर्यादा निश्चित केली जाईल. शेतकऱ्यांना आवश्यक तेवढा आणि योग्य वेळी निधी उपलब्ध व्हावा, हा यामागील उद्देश आहे.

तसेच कृषी क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीला चालना देण्यासाठी खर्चाच्या व्याप्तीत २० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. माती परीक्षण, रिअल-टाइम हवामान अंदाज, सेंद्रिय शेतीसाठी प्रमाणपत्र तसेच कृषी उपकरणांच्या दुरुस्ती व देखभालीसाठीही ही तरतूद लागू राहणार आहे.

६ मार्चपर्यंत सूचना मागविल्या आरबीआयने या मसुद्यावर ६ मार्च २०२६ पर्यंत बँका, शेतकरी संघटना, तज्ज्ञ आणि नागरिकांकडून अभिप्राय मागवले आहेत. अधिकृत संकेतस्थळ किंवा ईमेलद्वारे सूचना सादर करता येणार असून प्राप्त अभिप्रायांच्या आधारे अंतिम मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली जातील.

या बदलांमुळे शेतकऱ्यांसाठी कर्जप्रक्रिया अधिक वास्तवाधारित आणि लवचिक होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### दीड लाखांचे लोखंडी सुटे भाग विकून चालक फरार

**पुणे, ता. १३ :** पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यात विश्वासघाताचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मालवाहू पिकअप गाडीवर चालक म्हणून काम करणाऱ्या तरुणानेच मालकाचा विश्वास तोडत सुमारे १ लाख ५० हजार रुपयांच्या लोखंडी सुट्या भागांचा अपहार केल्याची घटना समोर आली आहे. माल कंपनीत पोहोचवण्याऐवजी त्याने वाटेतच विक्री करून गाडी बेवारस अवस्थेत सोडून पळ काढल्याचे तपासात उघड झाले आहे.


याप्रकरणी सोनल बलभीम अरडे यांनी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या बोलेरो पिकअप गाडीवर इरफान अन्सारी (वय २६, मूळ रा. उत्तर प्रदेश) चालक म्हणून कार्यरत होता. ९ फेब्रुवारी रोजी मशी येथून नऱ्हे येथील कंपनीकडे लोखंडी सुटे भाग वाहून नेण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली होती.माल वेळेवर पोहोचला नसल्याने संशय निर्माण झाला. चौकशी केली असता इरफानने माल कंपनीत पोहोचवलाच नसल्याचे स्पष्ट झाले. प्राथमिक तपासानुसार, त्याने वाटेतच लोखंडी भागांची विक्री करून रक्कम स्वतःजवळ ठेवली. त्यानंतर संशय टाळण्यासाठी पिकअप गाडी नवी मुंबई विमानतळ परिसरात सोडून तो फरार झाला. गाडी बेवारस स्थितीत आढळल्यानंतर आणि माल गायब असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा माग काढण्यासाठी तांत्रिक तपास आणि सीसीटीव्ही फुटेजची मदत घेतली जात आहे. औद्योगिक भागात वाहतूक करणाऱ्या मालाच्या सुरक्षिततेबाबत हा प्रकार गंभीर मानला जात असून, मालकांनी चालकांची पार्श्वभूमी पडताळणी आणि जीपीएससारख्या यंत्रणांचा वापर वाढवण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

### व्हाईट पर्ल स्पावर सुरु असलेल्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश; तिन महिलांची सुटका

**अमित मुंडीक**

पुणे, ता. १३ : पुणे पोलीस गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने हडपसर परिसरातील व्हाईट पर्ल स्पावर धाड टाकत सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा भांडाफोड केला. या कारवाईत तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, १२ फेब्रुवारी २०२६ रोजी दशमेश कॉम्प्लेक्स, प्रणय हॉटेलजवळ, पुणे-सोलापूर रोड, हडपसर येथील या स्पामध्ये महिलांना आणून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेतला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. बनावट ग्राहक पाठवून पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला.



या कारवाईदरम्यान स्पा व्यवस्थापक सौरभ शामराव इंगळे (वय २८, रा. काळेपडळ, हडपसर) याला ताब्यात घेण्यात आले. तसेच स्पाच्या मालकाविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुटका करण्यात आलेल्या तिन्ही महिलांना आवश्यक संरक्षण देऊन पुढील मदत प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३ (१)(३), ३(५) तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ च्या कलम ३, ४ आणि ५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख आणि पोलीस उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

### राज्यात ९०० दिव्यांग संस्थांची नोंदणी रद्द : तुकाराम मुंढे

**पुणे, ता. १३ :** राज्यात दिव्यांगांच्या नावाखाली अनियमितता करणाऱ्या संस्थांवर प्रशासनाने मोठा हातोडा चालवला आहे. कठोर आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांनी ॲक्शन मोडमध्ये येत तब्बल ९०० दिव्यांग संस्थांची नोंदणी रद्द केली आहे. विशेष म्हणजे, यापैकी ३६३ संस्थांवर केवळ २०२५ वर्षात कारवाई करण्यात आली आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार आवश्यक असलेली विशेष नोंदणी न करता अनेक संस्था केवळ सोसायटी किंवा ट्रस्ट म्हणून नोंदणी करून कार्यरत असल्याचे तपासात आढळून आले. संबंधित संस्थांकडे मूलभूत सुविधा, पारदर्शकता किंवा सेवा दर्जा नसल्याचेही निदर्शनास आले.



शासनाचा निधी पात्र संस्थांमार्फत खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने ही व्यापक कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

विभागनिहाय आकडेवारीनुसार छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक १०३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ पुणे विभागात ६०, कोकणात ५२, अमरावतीत ५० तर नाशिक आणि नागपूर विभागात प्रत्येकी ४९ संस्थांवर कारवाई झाली आहे.

प्रामाणिकपणे काम करणाऱ्या संस्थांना प्रशासनाने २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम संधी दिली आहे. या मुदतीत नोंदणी न केल्यास परवाना रद्द करण्याबरोबरच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमच्या कलम ९१ अंतर्गत फौजदारी कारवाई होऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

१७ ऑक्टोबर २०२५ पासून नवीन कार्यपद्धती लागू करण्यात आली असून, संस्थांना दरवर्षी नूतनीकरण बंधनकारक राहणार आहे. तसेच नियमित तपासणीची तरतूद करण्यात आली आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्थांमध्ये खळबळ उडाली असून, शासनाच्या निधीच्या वापरावर अधिक काटेकोर देखरेख ठेवली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## अभिषेक शर्मा पाकिस्तानविरुद्धचा सामना खेळणार?

**पुणे, ता. १३ :** २०२६ च्या टी-२० विश्वचषकातील पहिल्या सामन्यानंतर भारतीय संघाला धक्का बसला आहे. सलामीवीर अभिषेक शर्मा प्रकृती अस्वास्थ्यामुळे संघाबाहेर असून, दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या सामन्यात त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले नाही. १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणाऱ्या भारत-पाकिस्तान लढतीत त्याचा सहभागही सध्या अनिश्चित मानला जात आहे.

नामिबियाविरुद्धच्या सामन्यापूर्वी नाणेफेकीदरम्यान कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी अभिषेक पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याचे सांगितले होते. त्याला सावरण्यासाठी थोडा वेळ लागेल. तो एक-दोन सामने गमावू शकतो, असे सूर्याने म्हटले होते.

दरम्यान, सामन्यानंतर फिरकीपटू वरुण चक्रवर्ती यांने



सकारात्मक संकेत दिले. प्रसार माध्यमांशी बोलताना त्याने सांगितले, मी अभिषेकशी संवाद साधला आहे. तो आता बरा वाटत असल्याचे म्हणाला आणि त्याने सरावही केला. तो लवकरच पुनरागमन करेल, अशी आशा आहे.

दिल्लीला पोहोचल्यानंतर अभिषेकची प्रकृती अचानक बिघडली होती. पोटातील संसर्ग आणि उच्च तापामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्याला डिस्चार्ज देण्यात आला असला तरी तो अद्याप पूर्णपणे सावरलेला नाही. आजारपणामुळे त्याचे वजनही घटल्याची माहिती समोर आली आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात अभिषेक खेळणार की नाही, याचा अंतिम निर्णय कोलंबोमध्ये घेतला जाणार आहे. नेट सरावादरम्यान त्याची तंदुरुस्ती आणि दीर्घ सराव सत्रे पार पाडण्याची क्षमता पाहूनच संघ व्यवस्थापन निर्णय घेईल, असे संकेत मिळत आहेत. भारत-पाकिस्तान सामन्याच्या पार्श्वभूमीवर अभिषेकच्या प्रकृतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कदमवाकवस्ती येथील किराणा दुकानाचे शटर चोरट्यांनी फोडले; रोख रकमेसह वस्तूंवर मारला डल्ला

**लोणी काळभोर, ता. १३ :** रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी किराणा दुकानाचे शटर उचकटून दुकानातील रोख रकमेसह वस्तू चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील एंजल शाळेजवळ असलेल्या गणेश किराणा अँड जनरल स्टोअर्स मध्ये शुक्रवारी (ता.१३) पहाटे पानवे तीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

गणेश ज्ञानोबा पवार (वय ३५, स्टार सिटी, कवडी माळवाडी, कदमवाकवस्ती, ता.हवेली, जिल्हा पुणे) असे चोरी झालेल्या दुकानाच्या मालकाचे नाव आहे. मिळालेल्या



माहितीनुसार, गणेश पवार यांनी मागील एक महिन्यापूर्वीच हे किराणा दुकान सुरू केले होते. पवार यांनी नेहमीप्रमाणे गुरुवारी (ता.१२) रात्री साडेसहा वाजण्याच्या सुमारास दुकान बंद केले होते.

दरम्यान, गुरुवारी (ता. १२) रात्री पानवे तीन वाजण्याच्या सुमारास तीन चोरटे दुचाकीवरून आले. त्यांनी लोखंडी कटावणीच्या सहाय्याने दुकानाचे शटर उचकटले. आणि दुकानातील ७ ते ८ हजार रुपयांची रोकड व किराणा दुकानातील एक गोणी भरून वस्तू चोरी घेऊन गेले.

शुक्रवारी (ता.१३) सकाळी सात वाजता शेजाऱ्यांनी पवार यांना फोन करून सांगितले की, तुमचे दुकान फोडले आहे. त्यानंतर पवार तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पवार यांनी या घटनेची माहिती लोणी काळभोर पोलिसांना दिली.

या घटनेची माहिती मिळताच, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलिस हवालदार विलास शिंदे, पोलिस अंमलदार सूरज कुंभार, अशोक गिरी व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. चोरीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलिसांकडून पुढील कारवाई सुरू आहे.

# मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक लाच घेताना अटकेत




**मुंबई, ता. १३ :** मुंबईतील मंत्रालयात गुरुवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने टाकलेल्या छाप्यामुळे खळबळ उडाली आहे. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले लिपिक राजेंद्र ढेरंगे यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे.

थेट मंत्रालयातील कार्यालयावर झालेल्या या कारवाईमुळे राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली आहे. विरोधकांनी या प्रकरणावरून झिरवाळ यांच्यावर टीका सुरू केली आहे. दरम्यान, दिल्ली दौऱ्यावर असलेल्या मंत्री झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना या कारवाईबाबत पहिली प्रतिक्रिया दिली.

ते म्हणाले, मी गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत आहे. काल घडलेला प्रकार अत्यंत चुकीचा आहे. असे प्रकार घडू नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. राजेंद्र ढेरंगे हे सुनावणीसंबंधी कागदपत्रे तयार करण्याचे काम पाहत असून ते मूळचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी असल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. या प्रकरणाला मी कोणत्याही परिस्थितीत पाठिंबा देणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

ढेरंगे यांचा मंत्री किंवा त्यांच्या वैयक्तिक सहाय्यकांशी संबंध नसल्याचा दावा करत झिरवाळ म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील कर्मचारी नियुक्त करताना बारकाईने तपास केला आहे. संबंधित कर्मचाऱ्याविरोधात यापूर्वी कोणतीही तक्रार नव्हती. मात्र, लाचेची रक्कम कितीही असली तरी सरकारी कर्मचाऱ्याने पैसे घेणे चुकीचेच आहे. जर त्यांनी पैसे घेतले असतील तर त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागेल.

तसेच, चौकशीत माझा कोणताही संबंध आढळल्यास मी राजीनामा देण्यास तयार आहे, असा स्पष्ट इशाराही झिरवाळ यांनी दिला. दरम्यान, एसीबीकडून प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून मंत्रालयातील या कारवाईमुळे प्रशासनात खळबळ माजली आहे.

# लोणी काळभोर येथील समाजभूषण महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

**लोणी काळभोर, ता. १३ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय शैक्षणिक गुरुवारी (ता. १२) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. सांस्कृतिक विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निबंध, वक्तृत्व, चित्रकला, कराओके स्पर्धा तसेच मैदानी व इनडोअर खेळांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सलीम शिकलगार व प्रा. शबाना शिकलगार (ता. भोर) उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, मातोश्री सुशीलादेवी साळुंखे व मामासाहेब



काळभोर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी प्रमुख अतिथींचे शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी लोणी काळभोर विद्या संकुलाचे कार्याध्यक्ष राहुल आप्पा काळभोर, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना प्रा. सलीम शिकलगार म्हणाले, महाविद्यालयीन जीवन हे करिअर घडविण्याचे सुवर्णकाळ आहे. पदवी शिक्षणासोबत खेळ, कला व विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त गुणांना वाव द्यावा. यानंतर प्रा. सलीम शिकलगार, प्रा. शबाना शिकलगार व प्रा. आनंदा जाधव यांनी हिंदीमराठी गीतांचे बहारदार सादरीकरण करून विद्यार्थ्यांची मने जिंकली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा प्राचार्य सिताराम गवळी होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले, पारितोषिक म्हणजे केवळ बक्षीस नव्हे, तर कष्ट, जिद्द आणि सातत्याचा सार्वजनिक सन्मान आहे. अपयश ही यशाची पहिली पायरी असून मैदानात पडलेला खेळाडू पुन्हा उभा राहिला तरच जिंकतो.

दरम्यान, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी केले, तर वार्षिक अहवालाचे वाचन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड व प्रा. स्नेहा हिंगमिरे यांनी केले, तर आभार प्रा. मुकेश महाले यांनी मानले. समारंभाची सुरुवात संस्थेच्या प्रार्थनेने तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# पुण्यात चालत्या बसने घेतला पेट ; ५० प्रवासी थोडक्यात बचावले

**पुणे, ता. १३ :** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसांना आग लागण्याच्या घटनांमध्ये आणखी एका घटनेची भर पडली आहे. तळवडे येथील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या प्लांटजवळ धावत्या बसला अचानक भीषण आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. काही मिनिटांतच आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण बस जळून खाक झाली.



मिळालेल्या माहितीनुसार, बसमध्ये सुमारे ५० प्रवासी प्रवास करत होते. तळवडे परिसरातून जात असताना चालकाच्या निदर्शनास इंजिनच्या भागातून धूर निघताना दिसला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने तत्काळ बस रस्त्याच्या कडेला थांबवली. बस कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना तातडीने खाली उतरवले. प्रवाशांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली आणि सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

काही क्षणांतच बसला भीषण आग लागली. ज्वाळा आणि धुराचे लोट दूरवरून दिसत होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत बस पूर्णतः जळून सांगाडा शिल्लक राहिला होता.


या घटनेनंतर पुणे महानगर परिवहन महामंडळ च्या बसांच्या देखभालीबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किट किंवा इंजिनमधील तांत्रिक बिघाडामुळे आग लागली असावी, मात्र अधिकृत तपासानंतरच कारण स्पष्ट होणार आहे.

सार्वजनिक वाहतूक ही शहराची जीवनरेखा मानली जाते. त्यामुळे बसांच्या नियमित तपासणी, तांत्रिक देखभाल आणि सुरक्षेच्या उपाययोजना काटेकोरपणे राबवण्याची गरज असल्याची मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून होत आहे.

# जुन्नरमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्रितपणे काम करणार : माजी आमदार अतुल बेनके

**जुन्नर, ता. १३ :** राज्यात अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस एकत्र येण्याच्या चर्चेला वेग आला असतानाच त्याची पहिली ठोस झलक पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात पाहायला मिळाली आहे. स्थानिक पातळीवर अजित पवार गट आणि शरद पवार गट यांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती माजी आमदार अतुल बेनकेयांनी दिली.

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर पक्षात निर्माण झालेली पोकळी आणि कार्यकर्त्यांमधील संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर अनेक नेत्यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, अशी भूमिका मांडली आहे. अजित पवार यांनाही दोन्ही गटांनी एकत्र काम करावे, अशी




इच्छा होती, असा दावा त्यांच्या निकटवर्तीयांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर जुन्नरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही गटांनी एकत्र लढण्याचा प्रयोग केला.

अतुल बेनकेयांनी सांगितले की, मी आणि खासदार अमोल कोल्हे यांनी चर्चा करून जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय घेतला. मतांची विभागणी होऊ नये आणि तालुक्यात राष्ट्रवादीची ताकद कायम राहावी, हा त्यामागचा उद्देश होता. पुढे राज्यात काय होईल हे सांगता येत नसले तरी जुन्नरमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित वाटचाल करतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पुण्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीतील विजयी उमेदवारांची बैठक घेतली. अजित पवारांचा कामाचा वारसा पुढे नेण्यासाठी सकारात्मक आणि एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. जुन्नरमधील दोन्ही गटांचे पदाधिकारी त्यांना भेटले असता, स्थानिक स्तरावर एकत्र राहण्याच्या निर्णयाला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा दावा बेनके यांनी केला. जुन्नरमधील हा प्रयोग यशस्वी ठरल्यास राज्यातील इतर भागांतही दोन्ही राष्ट्रवादींच्या सहकार्याची शक्यता वाढू शकते. त्यामुळे पुढील काही महिन्यांत राज्याच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# अनधिकृत होर्डिंगवर महापालिकेचा हातोडा; पुढील ३ महिने शहरभर तपासणी मोहीम

**पुणे, ता. १३ :** शहरातील अनधिकृत होर्डिंग्सवर लगाम घालण्यासाठी महापालिकेने आता कडक मोहीम हाती घेतली आहे. आकाशचिन्ह (जाहिरात) विभागाने पाच विशेष पथके स्थापन केली असून, ही पथके शहरभर अचानक तपासणी करणार आहेत. परवानगीशिवाय उभारलेले फलक, मंजूर आकारमानापेक्षा मोठे होर्डिंग, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जाहिराती तात्काळ हटवण्यात येणार आहेत. अशी माहिती पोलीस उपायुक्त माधव जगताप यांनी दिली.

तपासणी कशी होणार? प्रत्येक होर्डिंगच्या ठिकाणी परवानगीचा बोर्ड लावलेला आहे का, परवानगीप्रमाणेच मोजमाप आहे का, संरचनात्मक सुरक्षितता




पाळली आहे का आणि जाहिरात धोरणातील इतर अटींचे पालन झाले आहे का, याची सखोल पडताळणी केली जाणार आहे. अनधिकृत फलक आढळल्यास ते तत्काळ निष्कासित केले जातील.

विशेष म्हणजे, संबंधित होर्डिंग किती वर्षांपासून उभे आहे, याचा मागोवा घेण्यासाठी गुगल इमेजचा आधार घेतला जाणार आहे. त्यानुसार थकित परवाना शुल्क, दंड आणि होर्डिंग काढण्याचा अंदाजे दोन लाख रुपयांचा खर्चही संबंधित जाहिरातदाराकडून वसूल केला जाईल.

पहिली कारवाई हडपसरमध्ये या मोहिमेची सुरुवात हडपसर भागातून करण्यात आली. तपासणीत होर्डिंग्सची पाहणी झाली असून त्यापैकी सात अनधिकृत आढळले. संबंधित फलक तातडीने हटवण्यात आले.

**का महत्त्वाची आहे ही मोहीम?**

अनधिकृत आणि निकृष्ट दर्जाची होर्डिंग्स वादळ, पावसाळ्यात कोसळण्याचा धोका निर्माण करतात. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आणि नागरिकांच्या सुरक्षेलाही धोका पोहोचतो. याशिवाय शहराच्या सौंदर्यावरही परिणाम होतो आणि महसुलाचाही तोटा होतो.

दरम्यान, महापालिकेने स्पष्ट केले आहे की ही मोहीम केवळ दिखाव्यासाठी नसून सातत्याने सुरू राहणार आहे. त्यामुळे जाहिरातदारांनी नियमांचे पालन करूनच फलक उभारावेत, अन्यथा कठोर आर्थिक कारवाईला सामोरे जावे लागेल.

## पुणे विमानतळावर ५ कोटींचे ‘ड्रग्स’ जप्त

**पुणे, ता. १३ :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ सध्या तस्करी करणारे रडारवर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. बँकॉकहून आलेल्या एका तरुणाने खेळण्यांच्या बॉक्समध्ये लपवून आणलेला तब्बल ५ कोटी ४२ लाख रुपयांचा ‘हायड्रोपोनिक वीड’ (उच्च दर्जाचा गांजा) जप्त करण्यात आला आहे. सीमा शुल्क विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने अत्यंत चाणाक्षपणे हा अमली पदार्थांचा साठा पकडला असून, तस्करीचा एक आंतरराष्ट्रीय कट उधळून लावला आहे. बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास ‘एअर इंडिया एक्स्प्रेस’चे विमान बँकॉकहून पुण्यात उतरले. एअर इंटेलिजन्स युनिटला आधीच गुप्त बातमी मिळाली होती की, या विमानातून मोठी तस्करी होणार आहे. तपासणी सुरू असताना एका ३२ वर्षीय प्रवाशाची घबराट अधिकाऱ्यांच्या नजरेतून सुटली नाही. जेव्हा त्याच्या सामानाची झडती घेण्यात आली, तेव्हा सर्वांनाच धक्का बसला.

## प्राईम लाईफ



## कडक उन्हातही थकवा जाणवणार नाही! रोजच्या आहारात करा हे छोटे बदल

तापमान वाढू लागला की, शरीरातील पाण्याची पातळी वेगाने घटते आणि याचा थेट परिणाम आपल्या पचनसंस्थेवर होतो. कडक उन्हामुळे येणारा थकवा, डिहायड्रेशन आणि उष्णतेचे विकार टाळण्यासाठी केवळ पाणी पिणे पुरेसे नसून, आहारातही बदल करणे काळाची गरज आहे. या ऋतूत आपली पचनशक्ती मंदावलेली असते, त्यामुळे जड आणि मसालेदार अन्नाऐवजी थंड आणि हलका आहार शरीराला ऊर्जा देण्याचे काम करतो. निसर्गाने या काळात दिलेली रसाळ ’ळे आणि भाज्यांचा आहारात समावेश केल्यास आपण उन्हाळ्यातील आजारांपासून स्वतःचा बचाव करू शकतो. चला तर मग जाणून घेऊया, कडक उन्हात स्वतःला फिट ठेवण्यासाठी आपला आहार कसा असायला हवा.

१. हायड्रेशन सर्वात महत्त्वाचे

शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी केवळ तहान लागल्यावरच नाही, तर ठराविक अंतराने पाणी पिणे गरजेचे आहे.

दिवसभरात ८-१० ग्लास पाणी प्या.

नारळ पाणी, लिंबू सरबत, कोकम सरबतहे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स संतुलित ठेवण्यास मदत करतात.

सरबतात साखरेऐवजी खडीसाखरेचा वापर करणे अधिक फायदेशीर ठरते.

२. ताक पोटासाठी वरदान

ताक : दुपारच्या जेवणानंतर एक ग्लास ताक प्यावे. यात प्रोबायोटिक्स असतात, जे आतड्यांचे आरोग्य सुधारतात.

दही-भात: दक्षिण भारतीय पद्धतीचा दही-भात उन्हाळ्यात पचायला सर्वात हलका आणि आरोग्यदायी मानला जातो.

३. फळे आणि भाज्या

आहारात अशा फळांचा समावेश करा ज्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त आहे.

फळे : कलिंगड, खरबूज, द्राक्षे, संत्री आणि डाळिंब.

भाज्या: काकडी, दुधी भोपळा, पडवळ आणि घोसाळी यांसारख्या फळभाज्या शरीराला थंडावा देतात.

४. काय टाळावे?

काही पदार्थ उन्हाळ्यात शरीराची उष्णता अधिक वाढवू शकतात:

मसालेदार आणि तेलकट पदार्थ: जास्त तिखट, मसालेदार किंवा तळलेले अन्न पचायला जड असते आणि त्यामुळे सिडिटी वाढते.

कॅफिनयुक्त पेये: चहा आणि कॉफीचे प्रमाण कमी करावे, कारण यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते.

जंकफुड: बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ आणि कार्बोनेटेड ड्रिंक्स पिणे टाळावे.


उन्हाळ्यासाठी प्रो-टिप :

सकाळी रिकाम्या पोटी धने-जिरे पाणी पिणे उन्हाळ्यात उष्णता कमी करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरते.

# रेशनकार्ड धारकांना पुढील ३ महिने तांदळाऐवजी मिळणार मका

**पुणे, ता. १३ :** राज्यशासनाच्या अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत रेशनकार्डधारकांना दरमहा गहू आणि तांदूळ दिला जातो. मात्र मार्च महिन्यापासून या वितरणात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. तांदळाऐवजी लाभार्थ्यांना गव्हासोबत मका देण्याचा निर्णय घेण्यात आला असून हा बदल पुढील तीन महिन्यांसाठी लागू राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील लाखो कुटुंबांच्या शिध्यात तात्पुरता बदल होणार आहे.

अहिल्यानगर जिल्हा येथे जिल्हा मार्केटिंग फेडरेशनमार्फत आठ खरेदी केंद्रांवर मका खरेदी सुरू आहे. आतापर्यंत सुमारे १५ हजार क्विंटल मका खरेदी करण्यात



आली असून २८ फेब्रुवारीपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहणार आहे. खरेदी केलेला मका रेशन दुकानांमार्फत थेट लाभार्थ्यांना वितरित केला जाणार आहे. शासनाच्या सूत्रांनुसार, साठा व्यवस्थापन आणि स्थानिक पातळीवरील उपलब्धतेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अंत्योदय योजनेतील कुटुंबांना दरमहा १० किलो मका आणि ११ किलो गहू दिला जाईल. तर प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती २ किलो गहू आणि १ किलो मका मिळणार आहे. जिल्ह्यात अंत्योदय योजनेचे ८७ हजार ६४ रेशनकार्डधारक असून एकूण ३ लाख ८६ हजार ३४ लाभार्थी आहेत. प्राधान्य कुटुंब योजनेत ६ लाख ३७ हजार ११४ रेशनकार्डधारक आणि २५ लाख ६३ हजार ९७१ लाभार्थी आहेत. या सर्वांना नव्या पद्धतीने मका वाटप होणार आहे.

मात्र या निर्णयामुळे काही लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. मकाचे काय करायचे? असा प्रश्न अनेकांकडून विचारला जात आहे. ग्रामीण भागात मक्याचे पीठ, भाकरी किंवा धान्याच्या स्वरूपात वापर सामान्य असला, तरी शहरी कुटुंबांना त्याचा वापर कसा करावा याबाबत माहिती कमी आहे. अन्नपदार्थांच्या बदलत्या सवयी आणि तांदळाच्या सवयीमुळे हा बदल स्वीकारणे काहींसाठी आव्हानात्मक ठरू शकते. नगर, घारगाव, श्रीगोंदा, घोगरगाव, मिरजगाव, शेवगाव, पाथर्डी आणि कोपरगाव येथे खरेदी सुरू असताना जामखेड आणि संगमनेर येथे अद्याप नोंदणी झालेली नसल्याची माहिती आहे. पुढील तीन महिने हा प्रयोग कसा राबवला जातो आणि लाभार्थ्यांचा प्रतिसाद कसा मिळतो, याकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का?

**मुंबई, ता. १३ :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका बाजूला अजित पवार यांच्या अकाली निधनाचे सावट आहे, तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांतील संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांनी वेगळे वळण घेतले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी पक्षाच्या साप्ताहिकात लिहिलेल्या एका लेखाने राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. १२ फेब्रुवारी रोजी विलीनीकरणाचा मोठा निर्णय होणार होता, असे संकेत खुद्द शरद पवार यांनी दिले होते. याच काळात शशिकांत शिंदे यांचा हा लेख समोर आल्याने पडद्यामागील हालचाली उघड झाल्या आहेत.

शिंदे यांनी लेखात म्हटले आहे की, विलीनीकरणानंतर ’दादा’ हेच पक्षाचे सर्वोच्च नेते असतील, असे शरद पवार गटाने निश्चित केले होते. दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांना मन मोठे करून एकत्र येण्याचे साकडे घातले आहे. या दाव्यामुळे एक गोष्ट स्पष्ट



होते की, शरद पवार गट लवचिक भूमिका घेण्यास तयार होता.

आमदार रोहित पवार यांनी आपल्याकडे विलीनीकरणाचे ठोस पुरावे असल्याचा दावा केला आहे. मात्र, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या गटाने हे दावे फेटाळून लावत रोहित पवारांना आव्हान दिले आहे. त्यावर, दादांच्या निधनामुळे आम्ही सध्या संयम पाळत आहोत, असे म्हणत रोहित पवारांनी तुर्तास माघार घेतली असली तरी, संघर्ष संपलेला नाही. दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## जिंती येथील शालिनी राजेभोसले यांचे निधन

**जिंती, ता. १३ :** जिंती (ता. करमाळा) येथील ज्येष्ठ सामाजिक व्यक्तिमत्त्व असलेल्या शालिनी उर्फ बेबीताई उमाजीराव राजेभोसले (वय ८१) यांचे गुरुवारी (ता.१२) रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. अत्यंत हुशार, सुशिक्षित आणि प्रेमळ स्वभावाच्या या व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने जिंती परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन बहिणी, भावजय व भाचे असा परिवार आहे.

शालिनी राजेभोसले यांच्या पार्थिवावर जिंती येथील मकाई बागेत शोकाकुल वातावरणात शुक्रवारी (ता. १३) सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, शासकीय व वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांत, संयमी आणि सर्वांना आपलेसे




करणाऱ्या बेबीताईंच्या आठवणींनी उपस्थितांचे डोळे पाणावले. बेबीताई राजेभोसले यांनी आयुष्यभर कुटुंबासोबतच समाजातील अनेकांना आधार दिला. त्यांच्या निधनाने जिंतीतील एक आदरयुक्त, प्रेमळ अध्याय संपुष्टात आला असून नागरिकांकडून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम खात्याचे माजी सभापती कै. बॉबीराजे भोसले, माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजीराजे राजेभोसले व शिवाजी राजेभोसले यांच्या त्या मोठ्या भगिनी होत.

## थेऊर येथील तरूणांकडून पानटपरीची तोडफोड ; तिघांवर गुन्हा दाखल

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १३ : चारचाकीने कट मारून मागितली माफी , दुसऱ्यादिवशी जिवेमारण्याची धमकी देत पानटपरीची तोडफोड केल्याची चित्रपटातील कथेसारखी धक्कादायक घटना कासुर्डी (ता. दौंड) येथे घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की मंगळवारी (ता. १० ) रात्री साडेआकार वाजण्याच्या सुमारास रमेश जाधव हे डबा घेवुन कासुर्डी फाटा येथे पायी चालत जात असताना सनी बोडकेयाने आपल्या ताब्यातील एम एच १२ एक्स क्यू ३२९७ रमेश जाधव यांना कट मारला व शिविगाळ करत असताना रमेश जाधव यांचे २ मुले त्याठिकाणी आले असता कार मधील सनी बोडके याने रमेश जाधव यांची माफी मागुन निघुन



गेला. त्यानंतर बुधवारी (ता. ११) सायंकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास रमेश जाधव यांचा मुलगा फिर्यादी मारुती जाधव हा पानटपरीत असताना सनी बोडके हा मित्रासह त्याठिकाणी आला व टपरीवर दगडफेक करत अप्रतिम साहित्य, खुर्च्यांची तोडफोड करत सुमारे २० हजारांचे नुकसान केले तसेच फिर्यादी मारुती जाधव यास शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी देऊन निघून गेले.

याबाबत मारुती जाधव यांनी यवत पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून सनी बोडके (रा . थेऊर , ता. हवेली) व सनी बोडकेयाचा मित्र या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत पुढील तपास पोलिस हवालदार मुटेकर हे करत आहेत. भरदिवसा पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर हा प्रकार घडला असल्याने कासुर्डी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे .

## झिम्बाब्वेचा ऑस्ट्रेलियावर २३ धावांनी धडाकेबाज विजय

**पुणे, ता. १६ :** टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत झिम्बाब्वेने बलाढ्य ऑस्ट्रेलियाला धक्का देत २३ धावांनी पराभूत केले. कोलंबो येथे झालेल्या या सामन्यात झिम्बाब्वेने सर्वांगीण कामगिरीच्या जोरावर महत्त्वाचा विजय नोंदवला.

प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने २० षटकांत २ गडी गमावत १६९ धावांचा भक्कम डोंगर उभारला. सलामीवीर ब्रायन बेनेटने याने नाबाद ६४ धावांची खेळी साकारत डावाला स्थैर्य दिले. त्याच्या संयमी आणि प्रभावी फलंदाजीमुळे संघाला स्पर्धात्मक धावसंख्या उभारता आली.

१७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात डळमळीत झाली. मधल्या फळीतील मॅट रेनशॉने ६५ धावांची



झुंजार खेळी करत सामना जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, इतर फलंदाजांना मोठी साथ देता आली नाही. अखेरीस ऑस्ट्रेलियाचा डाव १९.३ षटकांत १४६ धावांवर संपुष्टात आला.

गोलंदाजीत झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज सिंग मुझारबानीने ४ बळी घेत निर्णायक भूमिका बजावली. त्याच्या अचूक आणि धारदार माऱ्यामुळे ऑस्ट्रेलियाचा डाव कोलमडला.

या विजयामुळे झिम्बाब्वेने स्पर्धेत आपली दावेदारी ठळकपणे मांडली असून ऑस्ट्रेलियाला अनपेक्षित पराभवाचा धक्का बसला आहे.

## महिला सुरक्षा रक्षकाचा दारुड्या पतीकडून दहा वर्ष छळ; तीन मुलींनाही मारहाण

**लोणी काळभोर, ता. १३ :** दारूच्या नशेत पत्नी व तीन मुलींना मारहाण, अश्लील शिवीगाळ आणि चारित्र्यावर संशय घेत महिला सुरक्षा रक्षकाचा तब्बल दहा वर्षे शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील पांढरी मळा परिसरात घडली आहे. याप्रकरणी एकावर लोणी काळभोर पोलिस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशोक देवराव वानखेडे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका ३६ वर्षीय विवाहित महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी या लोणी काळभोर परिसरात सुरक्षा कर्मचारी म्हणून कार्यरत असून, पती अशोक




वानखेडे हे चालक म्हणून काम करतात. विवाहानंतर सुरुवातीला संसार सुरळीत होता; मात्र नंतर किरकोळ कारणांवरून व चारित्र्यावर संशय घेऊन आरोपी अशोक वानखेडे यांनी वारंवार मारहाण, शिवीगाळ व दमदाटी सुरू केल्याचा आरोप महिलेने केला आहे.

पीडितेच्या म्हणण्यानुसार, पती अशोक वानखेडे हा रोज दारू पिऊन घरी यायचा. पिडीता व तीन अल्पवयीन मुलींना अश्लील शिवीगाळ करून मारहाण करतो. यापूर्वीही पिडीता यांना पोलिसांत तक्रार दिली होती. नणंद व नातेवाईकांनी अशोक वानखेडे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; मात्र वागणुकीत कोणताही बदल झाला नाही. दरम्यान, गेल्या दहा वर्षांत सातत्याने शारीरिक मारहाण, मनसिक छळ आणि चारित्र्यावर संशय घेत त्रास दिला आहे. या वारंवार होणाऱ्या त्रासाला कंटाळून पिडीतेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपी अशोक वानखेडे याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ३५१ (१), ३५१ (२), ३५२ व ८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

# राहुल गांधींचे सदस्यत्व रद्द होणार?; संसदेत अराजकता पसरवल्याचा ठपका

## भाजप खासदारांचा नियम ३५२ अंतर्गत विशेष प्रस्ताव

**दिल्ली, ता. १३ :** यंदाच्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वातावरण सुरुवातीपासूनच तापलेले दिसत आहे. विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी सरकारवर सातत्याने हल्लाबोल करत विविध मुद्दे उपस्थित केले. कृषी धोरणे, राष्ट्रीय सुरक्षा, तसेच कथित उद्योगपतींना लाभदायक करार यावरून त्यांनी सरकारला लक्ष्य केले. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे काहीवेळा लोकसभेचे कामकाज तहकूब करावे लागले.

या पार्श्वभूमीवर भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत विशेष प्रस्ताव मांडत राहुल गांधी यांची सदस्यता रद्द



करण्याची मागणी केली आहे. लोकसभा नियम ३५२(५) आणि ३५३ अंतर्गत हा प्रस्ताव सादर करण्यात आला. दुबे यांनी आरोप केला की, राहुल गांधी परदेशी संस्थांशी संबंधित व्यक्तींशी हातमिळवणी करून देशाच्या हिताला बाधा पोहोचवणारी भूमिका घेत आहेत. त्यामुळे त्यांना अपात्र ठरवून भविष्यात निवडणूक लढवण्यास बंदी घालावी, अशी मागणी त्यांनी केली.

राहुल गांधी यांनी या आरोपांना सोशल मीडियावरून उत्तर देताना स्पष्ट केले की, सरकारला वाटत असेल तर त्यांनी माझ्याविरोधात एफआयआर दाखल करावा किंवा विशेषाधिकारभंगाचा प्रस्ताव आणावा; मात्र शेतकऱ्यांच्या हक्कांसाठीचा संघर्ष मी थांबवणार नाही. कोणताही करार शेतकऱ्यांच्या हिताविरोधात असेल तर त्याला विरोध केला जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

दरम्यान, भाजप नेत्या वानाथी श्रीनिवासन यांनी राहुल गांधींवर राष्ट्रीय सुरक्षेसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर राजकारण केल्याचा आरोप केला. माजी लष्करप्रमुख जनरल मुकुंद नरवणे यांच्या आत्मचरित्राचा संदर्भ देत त्यांनी काँग्रेसवर देशाच्या सुरक्षेचे राजकारण केल्याची टीका केली.

हा वाद केवळ व्यक्तीगत आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित नाही. संसदीय नियमांचा वापर करून विरोधी पक्ष नेत्यावर कारवाई करण्याची मागणी होणे ही गंभीर बाब मानली जाते. यामुळे संसदेतल्या चर्चेचा स्तर, विरोधी पक्षाची भूमिका आणि लोकशाहीतील सत्ताधारी-विरोधक यांच्यातील संबंध यावर व्यापक चर्चा सुरू झाली आहे. पुढील काही दिवसांत हा प्रस्ताव कितपत पुढे जातो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.